**MHRG120000292020**

**R.C.S./4/2020**
**Dattatray Gaiyakwad Vs. Narayan Limkar**

**निशाणी क्र.३८ कडील आदेश**

प्रतिवादीने त्याचे विरुध्द दिनांक ०८.०५.२०२५ रोजी झालेला "पुरावा बंद' आदेश रद्द करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीला महत्वाची कागदपत्रे व पुरेशी माहिती मिळाली नाही, प्रतिवादीचा सख्खा भाऊ आजारी होता व तो दिनांक १७.०५.२०२५ रोजी मयत झाल्याने प्रतिवादी न्यायालयात हजर राहून पुरावा दाखल करू शकला नाही. प्रतिवादीला पुरावा देण्याची संधी न दिल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. शेवटी प्रतिवादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. वादीतर्फे सदर अर्जांवर आक्षेप घेण्यात आला की, अर्जास जोरदार हरकत आहे. प्रतिवादीचा पुरावा दिनांक ०८.०५.२०२५ रोजी बंद करण्यात आला, परंतु प्रतिवादीच्या अर्जातील मयताची तारीख १७.०५.२०२५ आहे. त्यामुळे कारण योग्य व समर्पक नसल्याने प्रतिवादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

३. प्रस्तुत अर्ज, वादीचे म्हणणे व अभिलेख इ.चे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने त्याचा पुरावा बंद केल्यानंतर प्रतिवादीला पुरावा दाखल करण्यासाठी पुरेशी संधी देवूनही प्रतिवादीने पुरावा सादर न केल्याने व प्रकरण पाच वर्षांपेक्षा जास्त जुने असल्याने दिनांक ०८.०५.२०२५ रोजी प्रतिवादीविरूध्द 'पुरावा नाही' असे आदेश पारीत करण्यात आले. प्रतिवादीने अर्जासोबत त्याचे पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. प्रतिवादीने त्याच्या भावाच्या आजारपणाचे कागदपत्र जोडलेले नाही. मात्र त्याचा भाऊ दिनांक १७.०५.२०२५ रोजी मयत झाल्याची बाब नाकारण्यात आलेली नसल्याने त्यापूर्वी तो आजारी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. दाव्याचा निकाल गुण–अवगुणावर लागण्यासाठी व प्रकरणांची बाहुल्यता टाळण्यासाठी प्रतिवादीस पुरावा सादर करण्यासाठी एक संधी देणे आवश्यक आहे या मतास मी पोहचलो आहे. त्याचवेळी दाव्याच्या सुनावणीस झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीने वादीला ५००/– रुपये खर्च देणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो –

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी ३८ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीस रू.५००/– खर्चाच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर त्याचे विरुध्द पारीत झालेला दिनांक ०८.०५.२०२५ रोजीचा "पुरावा बंद" आदेश रद्द करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/–

( घन:शाम रा.तिवारी )

दिनांक : २२–०९–२०२५

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड